सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४७५/४९२/४१०
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक :
क्रमांक : १०/पदविका-मा.प्र./Intake Approval/२०२५/ 489    दिनांक : 19 SEP 2025

प्रति,
प्राचार्य,
औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत

संदर्भ :- संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एडीएम/Intake Approval/२०२५/१९२, दिनांक : २२.०५.२०२५

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेद्वारे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांची मान्यता प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे. त्या अनुषंगाने आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन पत्रान्वये निर्देशित करण्यात आले होते. औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची प्रवेशासाठीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप फेरी) लवकरच सुरु करण्यात येणार आहे. अद्यापही काही संस्थांची माहिती अद्ययावत करण्याचे प्रलंबित असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे.

त्याअनुषंगाने, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता प्रदान केल्याची माहिती व इतर माहिती अद्ययावत करुन **दि. २४ सप्टेंबर २०२५ दु. १२.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने पोर्टलवर निश्चित करावी. कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत करुन निश्चित करणे प्रलंबित राहिल्यास व त्यामुळे संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीमध्ये न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील. तसेच, मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चूक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास संबंधित संस्थेचे प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील.

( डॉ. विनोद मोहितकर )
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर.

२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर **दि. २४ सप्टेंबर २०२५ सायं. ०५.०० पर्यंत** अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

३) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.